ePaper
**ताथवडेतील ऑक्सिजन कंपनीला भीषण आग**



| वर्ष - 7 | अंक - 152 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**
- विराट -राहुलची जिगरबाज खेळी!
- युद्धात अडकली होती नुसरत!
- इस्रायलमध्ये गंभीर परिस्थिती!
- भुजबळांच्या अडचणी वाढणार?

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 9 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शरद पवार गट 'पॉवरफुल'!

## » पानसरेंची भूमिकेनंतर 'आउटगोईंग'ला प्रेरणा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराचे माजी महापौर ज्येष्ठ नेते आझम पानसरे यांनी खा. शरद पवार यांच्या उपस्थितीत त्यांच्या पक्षात राहण्याचा निर्णय घेतला आहे. पानसरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच भाजपाची साथ सोडून घेतलेला हा निर्णय अनेकांच्या राजकीय भुवया उंचाविणारा ठरला आहेत. विशेष म्हणजे, अल्पसंख्याक समाजाचा प्रभावशाली चेहरा असलेले पानसरे शरद पवार गटाकडे गेल्यामुळे अजित पवार गटाला मोठा फटका बसला आहे.**



आगामी निवडणूकांपर्यंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातील 80 टक्के नेते खा. शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखालील राष्ट्रवादीत सहभागी होतील, अशी शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. तर दुसरीकडे पानसरे यांच्यासारखा नेता गमावणे हे अजित पवार गटाला परवडणारे नाही. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी ज्येष्ठांची मोट बांधल्याचा दावा यापूर्वी केला जात होता. मात्र, पानसरे यांच्या भूमिकेमुळे त्याला तडा गेला असून, गव्हाणे बेसावध राहिल्यामुळेच पानसरेंसारखा बडा नेता शरद पवार गटाच्या हाताला लागला, अशी खंत अजित पवार समर्थकांमधून व्यक्त होत आहे. राष्ट्रवादीच्या दुहीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बालेकिल्ल्यात खा. शरद पवार गटाची अवस्था खिळखिळी झाली होती. मात्र शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी जबाबदारी पेलून पक्षाचा विस्तार करत राजकीय धक्कातंत्र वापरायला सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणजे शहरातील 'पॉवरफूल' नेते अशी ओळख असलेले आझम पानसरे यांचे खा. शरद पवार यांच्या गटाला दिलेले समर्थन बोलके आहे.

शहराध्यक्ष कामठे यांना आझम पानसरे यांचे मन वळविण्यात यश आले आहे. शिवाजीनगर येथे खा. पवार यांची भेट घेऊन पानसरे यांनी आपले समर्थन जाहिर केले आहे. गेले काही दिवस तुषार कामठे यांची टीम सतत पानसरे यांच्या संपर्कात होती. काही दिवसांपूर्वी आमदार रोहित पवार यांनी तुषार कामठे आणि रविकांत वरपे यांच्या समवेत आझम पानसरे यांच्या घरी राजकारणाची खलबतं सुरु केल्याची चर्चा आहे. आझमभाई यांच्या अनेक भेटी गाठीमध्ये तुषार कामठे यांच्या सोबत सुलक्षणा शिलवंत, गणेश भोंडवे, शिरीष जाधव, काशिनाथ जगताप, मुख्य प्रवक्ते माधव पाटील, राजन नायर, देवेंद्र तायडे, प्रशांत सपकाळ यांचा समावेश होता, अशा चर्चा रंगल्या आहेत.

खा. पवार यांचे एकेकाळचे अत्यंत विश्वासू अशी ओळख आझम पानसरे यांची आहे. पानसरे यांना मानणारा मोठा वर्ग शहरातील राजकीय वर्तुळात आणि सर्वसामान्यांमध्ये कार्यरत आहे. त्यांच्या इशाऱ्यावर राजकीय नाट्यमय घडामोडी घडू शकतात. गतवेळच्या महापालिका निवडणूकीत आझम पानसरे यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाने भाजपा सत्तेवर आली. जे जिकडे असतील तिथला विजय असे चित्र आहे. आगामी काळात ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बाजूच्या नेत्यांना खा. शरद पवार यांच्या बाजूने आणण्यात पानसरे महत्त्वाची भूमिका बजावतील अशी शक्यता आहे.

### पुन्हा पवारसाहेबांचा नारा?

» या लोकसभा निवडणुकीमध्ये अजित पवार गटातून 30 ते 40 टक्के स्थानिक नेते शरद पवारांकडे जातील व राहिलेले नेते विधानसभा निवडणुकीपर्यंत शरद पवारांकडे जातील, असा अंदाज राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. भाजपाच्या विरुद्ध लढायचे असेल तर खा. शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासारख्या मुरब्बी नेत्यांसोबत राहावे लागेल अशी मानसिकता राष्ट्रवादीतील अनेक नेत्यांची आहे. त्यामुळे सत्तेचा फायदा मिळण्यासाठी सध्या अजित पवार यांच्यासोबत असलेले बरेच नेते आपापल्या कार्यकर्त्यांसमवेत विधानसभा निवडणुकीपर्यंत किंवा त्या आधीच शरद पवारांकडे गेलेले आपल्याला पाहायला मिळतील अशी शक्यता आहे.

### अजित गव्हाणेंची डोकेदुखी वाढणार...

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांना समर्थन देणाऱ्या माजी नगरसेवक तुषार कामठे यांच्यावर खा. शरद पवार गटाने शहराध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. कामठे यांच्या बरोबर आझम पानसरे, सुलक्षणा शिलवंत, इम्रान शेख आदींनी खा. पवारांची साथ कायम ठेवली. पानसरे यांना गमाविणे हे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांचे अपयश मानले जात आहे. आगामी काळात 80 टक्के नेतृत्व खा. शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या बाजूने जातील, असे चित्र आहे. त्यामुळे आपले अस्तित्त्व टिकविण्याचे आव्हान अजित गव्हाणे यांच्या पुढे आहे. ते हे आव्हान गव्हाणे यांना पेलावे लागणार आहे.

---

# पुण्यातून लातूर, मराठवाड्यात विशेष रेल्वे!

## » प्रवाशांना दिलासा : पुणे-हरंगुळ-पुणे सुविधा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी पुणे-हरंगुळ-पुणे दरम्यान विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्र. 01487 पुणे - हरंगुळ एक्स्प्रेस दिनांक 10 ते 31 ऑक्टोबर या कालावधीत पुण्याहून दररोज 06.10 वाजता सुटेल आणि 12.50 वाजता हरंगुळला पोहोचेल. मार्गात ही गाडी हडपसर 06.22, केडगाव 06.40, दौंड 07.42, जेऊर, केम, कुर्डुवाडी, बार्शी टाऊन आणि उस्मानाबाद येथे थांबेल.**



मुंबईहून येणाऱ्या लातूर रेल्वेत अनेकदा पुण्याच्या प्रवाशांना जागा मिळत नव्हती. त्यामुळे स्थानकातून मध्यरात्रीच्या वेळी प्रवाशांना परत जावे लागत होते. आता मुंबईहून येणाऱ्या रेल्वेत जागा नाही मिळाली सकाळी पुण्याहून लातूरपर्यंतच्या प्रवाशांची नव्या रेल्वेमुळे सोय होणार आहे.

तसेच पुणे ते लातूर या मार्गावर रेल्वे गाड्यांची संख्या कमी आहे. या गाड्यांना खूपच गर्दी असते. त्यामुळे पुणे ते लातूर दरम्यान रेल्वे सुरू करण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार पुणे विभागाने पुणे ते लातूर दरम्यान गाडी सुरू करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाला पाठविला होता. त्यानुसार रेल्वे बोर्डाने पुणे ते हरंगुळ दरम्यान रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

### गाडीचे वेळापत्रक व रचना

**» गाडी क्र. 01488 हरंगुळ - पुणे एक्स्प्रेस दिनांक 10 ते 31ऑक्टोबर दरम्यान हरंगुळ येथून दररोज 15.00 वाजता सुटेल आणि 21.00 वाजता पुण्याला पोहोचेल. मार्गात ही गाडी उस्मानाबाद, बार्शी टाउन, कुर्डुवाडी, केम, जेऊर, दौंड 19.35 , केडगाव 19.47 वाजता आणि हडपसर 20.40 वाजता थांबेल. या गाडीला सामान्य श्रेणी 03, स्लीपर05, थ्री एसी04, सेकंड एसी 01 आणि फर्स्ट एसी01कोच असतील. प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन रेल्वे कडून करण्यात आले आहे.**

# काँग्रेस पक्षात गटबाजी नाही!

## » धंगेकर आजारी असल्याने बैठकीला गैरहजर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहर काँग्रेस कार्यालयात प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली पाश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यापूर्वी राज्यातील अनेक घटना बाबत नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली.**

यावेळी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार विश्वजीत कदम, आमदार प्रणिती शिंदे, पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. मात्र या बैठकीला कसबा विधानसभा मतदार संघाचे आमदार रविंद्र धंगेकर हे उपस्थित नव्हते तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेल्या बॅनरवर फोटो देखील नव्हता. त्यामुळे काँग्रेसमध्ये गटबाजी सुरू का? त्या प्रश्नावर नाना पटोले म्हणाले की, रविंद्र धंगेकर हे आजारी आहेत.



त्यामुळे बैठकीला येऊ शकले नाही. पण मीडियाला आमची जास्त काळजी दिसत आहे. तुम्ही भाजपकडे बघा, काँग्रेसमध्ये कुठलीही गटबाजी नाही. जर गटबाजी राहिली असती तर आम्ही कसबा कसा जिंकलो असतो. कसब्याची जागा आम्ही जिकणार असं म्हटलं होतं आणि आम्ही जिंकून दाखविले. अशी भूमिका मांडत काँग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मागील काही दिवसापूर्वी आगामी लोकसभा निवडणुकीत पुणे लोकसभा मतदार संघातून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे निवडणुक लढविणार अशी चर्चा सुरू होती. ती चर्चा थांबत नाही तोवर काँग्रेस पक्षाच्या नेत्या प्रियांका गांधीदेखील पुण्यामधून निवडणुक लढविणार असल्याची चर्चा सुरु झाली. या सर्व घडामोडी दरम्यान आज पुण्यात काँग्रेस पक्षाची पाश्चिम महाराष्ट्र विभागीय बैठकीच आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रियांका गांधी पुणे लोकसभा निवडणुक लढणार का? असा प्रश्न नाना पटोले यांना विचारण्यात आला असता त्यांनी, आपण त्यांना पत्र पाठवून द्या अशी मिश्किलपणे टिप्पणी करताच एकच हशा पिकला. तर याबाबत हाय कमांड निर्णय घेईल अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली. तसेच यावेळी नाना पटोले म्हणाले की,आगामी लोकसभा निवडणुक लक्षात घेऊन विभागीय निहाय बैठका आयोजित केल्या आहेत. त्यामध्ये पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आम्हाला आगामी निवडणुकीत यश निश्चित मिळेल. त्याच बरोबर आम्ही जागावाटपासंदर्भात मेरिटनुसार निर्णय घेणार असून पश्चिम महाराष्ट्राबाबत सांगायचे झाल्यास महाविकास आघाडी सर्व जागा जिंकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### महागाई, बेरोजगारी कुणी वाढवली

» केंद्र आणि राज्य सरकार विरोधात जनतेमध्ये प्रचंड रोष आहे. त्यामुळे महापालिका, जिल्हा परिषद यांच्या निवडणुक होत नाही. राज्य सरकार आणि प्रशासक कारभार पाहत आहे. यामुळे सर्व सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे. पण आगामी निवडणुका कधी ही झाल्यास केंद्र आणि राज्य सरकारला जनता निश्चित जागा दाखवेल, तर राहुल गांधींना भाजप रावण म्हणून उल्लेख करत आहे. पण महागाई, बेरोजगारी कुणी वाढवली. तर रावण प्रवृत्तीच्या केंद्र आणि राज्य सरकारने वाढवली आहे. त्यामुळे या रावण प्रवृत्तीच्या सरकाराच दहन करायचं आहे. अशा शब्दात केंद्र आणि राज्य सरकारच्या कारभारावर त्यांनी टीका केली.

# शिळ्या कडीला उत आणण्यात अर्थ नाही

## » टोल मुद्द्यावरून अंधारेंचा मनसेला टोला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**टोलचा मुद्दा काढून महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेच्या मुद्द्यावरील लक्ष कोणी भटकवू नये. सध्या आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे, टोलचा नव्हे. उगाच शिळ्या कडीला उत आणण्यात काही अर्थ नाही, असं म्हणत अप्रत्यक्षरीत्या मनसेला उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी टोला लगावला आहे. त्या पुण्याच्या वडगाव मावळमध्ये बोलत होत्या.**

वडगाव मावळ या ठिकाणी जनरल मोटरच्या कर्मचाऱ्यांकडून बेमुदत साखळी उपोषण सुरू आहे. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याने त्यांच्यावर ही वेळ आलेली आहे. त्यांच्या साखळी उपोषणाला पाठिंबा दर्शवण्यासाठी सुषमा अंधारे यांनी भेट दिली. कामगारांचा प्रश्न लवकर न सोडवल्यास येत्या १२ तारखेला आम्ही तळेगाव एमआयडीसीला ताळे लावू असा इशाराही त्यांनी दिला आहे. अंधारे प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.



### आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटरवर

» राज्यातील आरोग्य व्यवस्था ही व्हेंटिलेटरवर गेलेली आहे. पुण्यातील ससून असो की जळगाव, नाशिक येथील परिस्थिती. वर्षभराचं हाफकीनचं २२६ कोटींचं बिल आरोग्यमंत्र्यांनी वेळेत दिल असतं तर त्या-त्या संबंधित रुग्णालयाला औषध पुरवठा झाला असता आणि हे बळी गेले नसते, असं मत सुषमा अंधारे यांनी व्यक्त केलं आहे. त्या पुढे म्हणाल्या की, हे बळी शासकीय हलगर्जीपणामुळे गेलेले असून आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे. हे सर्व सुरू असताना काही जण शिळ्या कढीला ऊत आणत असून त्याचा काहीच अर्थ नाही, असं म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे मनसेला टोला लगावला आहे. तीस लाखांची गाडी घेणारा व्यक्ती फिरू शकतो तर तो ५० ते ३० रुपयांचा टोलही भरू शकतो.

राज्यातील आरोग्य व्यवस्था ही व्हेंटिलेटरवर गेलेली आहे. पुण्यातील ससून असो की जळगाव, नाशिक येथील परिस्थिती. वर्षभराचं हाफकीनचं २२६ कोटींचं बिल आरोग्यमंत्र्यांनी वेळेत दिल असतं तर त्या-त्या संबंधित रुग्णालयाला औषध पुरवठा झाला असता आणि हे बळी गेले नसते, असं मत सुषमा अंधारे यांनी व्यक्त केलं आहे. त्या पुढे म्हणाल्या की, हे बळी शासकीय हलगर्जीपणामुळे गेलेले असून आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे. हे सर्व सुरू असताना काही जण शिळ्या कढीला ऊत आणत असून त्याचा काहीच अर्थ नाही, असं म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे मनसेला टोला लगावला आहे.

तीस लाखांची गाडी घेणारा व्यक्ती फिरू शकतो तर तो ५० ते ३० रुपयांचा टोलही भरू शकतो. सध्या आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. तो मुद्दा आम्हाला सोडायचा नाही. सरकारचा तो मुद्दा डायव्हर्ट करू द्यायचा नाही. त्यासंबंधीचा मुद्दा काही कंत्राटदार डायव्हर्ट करून सरकारला मदत करत आहेत, असंही अंधारे म्हणाल्या.

# रेल्वेतून विनातिकीट प्रवास महागात !



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

रेल्वेकडून विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू आहे. पुणे विभागातील तिकीट तपासणी पथकांनी सप्टेंबर महिन्यात विनातिकीट प्रवास करणाऱ्या १७ हजार ६२२ प्रवाशांना पकडले. त्यांच्याकडून १ कोटी ४२ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. रेल्वेकडून सातत्याने तिकीट तपासणीची मोहीम सुरू आहे. या मोहिमेत सप्टेंबरमध्ये १७ हजार ६२२ प्रवासी विनातिकीट प्रवास करताना आढळून आले. त्यांना १ कोटी ४२ लाख १७ हजार रुपयांचा दंड करण्यात आला. तसेच, अनियमित प्रवास करणारे ९ हजार ३६४ जण सापडले. त्यांच्याकडून ५५ लाख २८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. याचबरोबर सामानाची नोंदणी न करता तसेच घेऊन जाणाऱ्या १५६ जणांकडून २७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. ही कारवाई विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक ब्रिजेश कुमार सिंह आणि वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ. मिलिंद हिरवे यांच्या समन्वयाने आणि विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ. रामदास भिसे यांचे नेतृत्वाखाली तिकीट निरीक्षक आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या मदतीने करण्यात आली.

# थकबाकीदारांचे धाबे दणाणले!

## चार दिवसांत 68 मालमत्ता जप्त : थकीत कर भरण्याचे महापालिकेचे आवाहन

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे. वारंवार थकीत कर भरण्याचे आवाहन करूनही कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या 68 जणांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. त्यामुळे आता मालमत्ता धारकांचे धाबे दणाणले आहेत. जप्ती पथक दारात जाताच 62 जणांनी तत्काळ धनादेश अथवा रोख पैसे भरले. थकबाकीदारांना आपली मालमत्ता जप्त होऊ नये, यासाठी त्वरित कराचा भरणा करावा, असे आवाहन कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.**





शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 7 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभाग कर वसूल करत आहे.

गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाव्दारे जनजागृती, महत्त्वाच्या चौकात होर्डिंग्ज, रिल्स स्पर्धा, सोशल मीडियाचा प्रभावी वापर याचबरोबर

प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा CUSTOMISED SMS पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे 2023-24 च्या पहिल्या सहामाहीत 585 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात आला आहे. आता वारंवार आवाहन करूनही कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांना 1 ऑक्टोबरपासून दोन टक्के विलंब शुल्क लागू झाले आहे. आता थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी तीव्र मोहीम हाती घेण्यात आली आहे.

### जप्ती मोहिमेसाठी विविध उपक्रम राबविणार

- यूट्यूबवर टार्गेट ऑडियन्स पाहून त्या त्या विभागामध्ये जाहिरात प्रसिध्द करणार
- रिक्षावरती जिंगल द्वारे प्रबोधन करणार असून रिक्षा वरती छोटे पोस्टर जे ठळक अक्षरामध्ये असतील की जप्तीची मोहिमेची माहिती देणार.
- महापालिकेच्या हद्दीमधील महत्वाचे वितरित होणारे वर्तमानपत्रामध्ये अमूलच्या धर्तीवर अभियान राबविण्यात येणार. सलग तीन महिने माहितीपर आणि व्यंगचित्रात्मक जाहिरात देण्यात येणार आहे. तसेच पॉम्पलेटही वाटप करण्यात येणार आहेत.

---

# कामगार नेते काशिनाथ नखातेंवर मोठी जबाबदारी!

## शरद पवारांचा निर्णय : असंघटित कामगार सेलच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांच्या आदेशाने स्थापन झालेल्या नॅशनलिस्ट ट्रेड युनियन फेडरेशनच्या ( एनटीयुएफ) राष्ट्रवादी कामगार संघटना फेडरेशनच्या असंघटित कामगार विभागाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी कामगार नेते काशिनाथ नखाते यांची निवड करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार, कामगार सेलचे प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव खटकाळे यांच्या हस्ते राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांचे मान्यतेने नियुक्तीचे पत्र शिवाजीनगर पुणे येथे देण्यात आले. महाराष्ट्र राज्यातील संघटित व असंघटित कामगारांना एकत्रित करून व्यापक लढा देण्याच्या दृष्टिकोनातून ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले.**



या वेळी कामगार सेलचे सरचिटणीस सोमनाथ शिंदे, उपाध्यक्ष स्वप्निल भगत, राज्य सचिव तुषार घाटूळे, सचिन नागणे, उमेश डोर्ले आदी उपस्थित होते.

कामगार नेते काशिनाथ नखाते हे असंघटित कामगारांच्या न्याय हक्काची लढाई सुमारे २५ वर्षापासून लढत आहेत. सुमारे ३५ हजार कष्टकरी, कामगार सभासदांच्या माध्यमातून कष्टकरी संघर्ष महासंघ महाराष्ट्र तर्फे पिंपरी चिंचवड, पुणे जिल्हा व महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये संघटनेचे कामकाज प्रभावीपणे सुरू आहे. सध्याच्या सत्तेत असणाऱ्या सरकारकडून कामगारांवर होत असलेल्या अन्यायकारक धोरणे, कायद्यातील बदलामुळे कामगार संकटात सापडला आहे. त्यांच्या पाठीशी भक्कमपणे फेडरेशनच्याच माध्यमातून नखाते यांचे निवडीने काम उभे राहील.

या वेळी शिवाजीराव खटकाळे म्हणाले की, संसदेत चुकीच्या पद्धतीने ठराव करून श्रमसंहिता लागू केल्यामुळे लाखो कामगार देशोधडीला लागलेले आहेत. कामगारांना कधीही काढून टाकले जात आहे. वेतन देण्यास टाळाटाळ केली जात आहे. अशा स्थितीत कामगारांना एकत्रित करून महाराष्ट्र राज्यामध्ये कामगारांचे संघटन बांधून हक्काची लढाई राष्ट्रवादी कामगार सेल व नॅशनल ट्रेड युनियनच्या माध्यमातून भविष्यामध्ये मोठे काम उभे राहील.

> “ देशाचे नेते खा. शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व शिवाजीराव खटकाळे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व फेडरेशननेच्या माध्यमातून विश्वास टाकत प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. ही जबाबदारी समर्थपणे पेलून महाराष्ट्र राज्यातील कष्टकरी कामगारांचा आवाज बुलंद करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. शिव, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ विचारांचा वारसा जपण्यासाठी कामगार चळवळीला न्याय देण्यासाठी अविरत प्रयत्नशील राहणार आहे. तसेच राज्यभर संघटन उभे करून कामगारांचे प्रश्न सोडविणार आहे.
>
> **- काशिनाथ नखाते,** कामगार नेते.




# भाजपसाठी इकडे आड, तिकडे विहीर!

**जातिनिहाय जनगणना करायला मान्यता द्यायची तरी पंचाईत आणि नाही द्यायची तरी पंचाईत अशी भाजपची सध्याची अवस्था आहे. नितीशकुमार यांनी घातलेला हा पेच २०२४ च्या लोकसभा निवडणुकांसाठी भाजपला चांगलाच अडचणीचा ठरणार अशी चिन्हे दिसत आहेत.**

गेल्या आठवड्यातील स्तंभात, मी भाजप आणि इंडिया आघाडी यांच्यातील संघर्षाचा संदर्भ दिला होता. मी एनडीए हा भाजपच्या आधीच्या आघाडीचा संक्षेप वापरला नव्हता कारण, सध्या कोणत्याही महत्त्वाच्या राजकीय पक्षाने भाजपचा मित्रपक्ष असल्याचे, भाजपबरोबर आघाडी करत असल्याचे जाहीर केलेले नाही. २०१९ च्या निवडणुकीत शिवसेना, अकाली दल, जनता दल (युनायटेड) आणि एआयएडीएमके हे एनडीएमधले महत्त्वाचे भागीदार होते. हळूहळू ते सगळेच भाजपपासून वेगळे झाले आहेत. त्यापैकी एआयएडीएमकेने काडीमोड घेण्याची घटना अगदी अलीकडची. दुसरीकडे, २०१९ मध्ये यूपीए या नावाने असलेली आघाडी आता इंडिया या नावाने विस्तारली आहे आणि ती अधिक मजबूत दिसते आहे. मला अपेक्षा होती त्याप्रमाणे, भाजपने सनातन धर्म, धर्मांतर, लव्ह जिहाद, महिला आरक्षण विधेयक, संसदेची नवीन इमारत आणि जी- ट्वेंटी नेत्यांच्या



शिखर परिषद या मुद्द्यांभोवती आपली तटबंदी उभी केली आहे. पंतप्रधानांनी सहा दिवसांत चार राज्यांमध्ये आठ सभांमध्ये भाषणे केली. या भाषणांमध्ये त्यांनी न चुकता बिगर-भाजपशासित राज्यांमधील सरकारे (आणि त्यांचे मुख्यमंत्री) देशातील सर्व राज्य सरकारांमध्ये सगळ्यात जास्त भ्रष्ट असल्याचे सांगितले. तर भाजपशासित राज्यांमधील राज्य सरकारे (आणि त्यांचे मुख्यमंत्री) देशातील सर्व राज्य सरकारांमध्ये सर्वोत्तम आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. एखाद्याला वाईट ठरवायचे असो वा चांगले, मोदी त्यात हात आखडता घेत नाहीत. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी महागाई आणि बेरोजगारी या मुद्द्यांवर त्यांचे लक्ष केंद्रित केले आहे. पण गेल्या आठवड्यात, त्यांनी त्यांचे लक्ष्य आणखी विस्तारले. द्वेषयुक्त भाषण (खासदार रमेश बिधुरी), स्वातंत्र्यावर आलेला अंकुश राज्यांची देणी नाकारणे (पश्चिम बंगालला मनरेगा निधी), राज्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण (तमिळनाडूमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालये किंवा जागा मिळणार नाहीत), न्यायालयांचे महत्त्व कमी करणे (न्यायवृंदांच्या ७० शिफारशी प्रलंबित), चिनी घुसखोरी (सतत मौन), दहशतवादी घटना (काश्मीर), अर्थव्यवस्थेचा मंदावलेला वेग (२०२२-२३ मधील ७.२ टक्के विकासदरानंतर २०२३-२४ मध्ये ६.३ विकासदर अपेक्षित आहे.) गुप्तचर आणि तपास यंत्रणांचा गैरवापर (केवळ विरोधी नेत्यांवरच प्रकरणे) आणि वाढते व्यक्तिमहात्म्य (पाच राज्यांमधील निवडणुकीसाठी मतदारांसमोर जाताना मोदी हाच भाजपचा चेहरा असेल) या मुद्द्यांवरही विरोधकांनी बोलायला सुरुवात केली आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांचा अंदाज कोणालाही आला नाही. त्यांनी बिहारमध्ये केलेल्या जातिनिहाय जनगणनेच्या सर्वेक्षणाचे निकाल जाहीर करून सगळ्या देशाला आश्चर्याचा धक्का दिला. बिहारमधील लोकसंख्येच्या ६३ टक्के ओबीसी आहेत, हे त्यातूनच समजले. जातिनिहाय जनगणनेच्या सर्वेक्षणाच्या या लाटेत 'एक देश, एक निवडणूक' आणि समान नागरी संहिता यासारखे मुद्दे वाहून गेले. कर्नाटकने जाहीर केले की त्यांच्या जात सर्वेक्षणाचे निकाल "योग्य वेळ आल्यावर" प्रकाशित केले जातील. ओडिशानेही त्या राज्यात जात सर्वेक्षण सुरू असल्याचे जाहीर केले. उत्तर प्रदेश हे जातीच्या मुद्द्यावर देशातील इंडिया आघाडीने महिला आरक्षण विधेयक 'ओबीसी विरोधी' असल्याचे सांगत आणि पहिली संधी मिळताच या कायद्यात सुधारणा करण्याचे आश्वासन देत आपला पाया पक्का करून घेतला. राहुल गांधी यांनीही इंडिया आघाडी सरकारच्या अजेंड्यावर सगळ्यात अग्रभागी जातिनिहाय जनगणना असेल हे स्पष्ट केले. नोटाबंदीनंतर भाजप प्रचंड गोंधळलेला आहे. पक्षाचे नेते (ज्यांना विचार करण्यास किंवा बोलण्यास मनाई आहे) मोदींकडून कोणताही संकेत मिळण्याची वाट पाहात असतात.

## संपादकीय »

# आरक्षणाचा मार्ग

***मराठा समाजाला आरक्षणातून वगळण्याचा जो कट सातत्याने सरकार दरबारी करण्यात आला, त्या कटाच्या माध्यमातून मराठा समाजाला मराठा ओबीसी आरक्षणातून वगळण्यात आले.***

मराठा समाज हा इंग्रज सत्ता असतानाही आरक्षणामध्ये होता. तथापि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मराठा समाजाला आरक्षणातून वगळण्यामध्ये कटकारस्थानी मंडळींनी कार्यभाग साधल्याचे कागदोपत्री पुरावे दिसत आहेत. मराठा समाजाला आरक्षणातून वगळल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांनी, आर्थिक आधारावर 18 मे 1959 रोजी सरसकट शैक्षणिक सवलती दिल्यामुळे समाजाला आर्थिक खर्चाचा फटका 1992 पर्यंत बसला नाही. कारण यशवंतराव चव्हाण यांच्या निर्णयामुळे समाजातील जवळपास 80 टक्के समाज हा शैक्षणिक सुविधा व सवलती भोगत होता. तथापि सुप्रीम कोर्टाच्या इंदिरा सहानी निकालानंतर आर्थिक आधारावरील आरक्षण बेकायदेशीर असल्याचा निर्णय आल्यामुळे, महाराष्ट्रातील आर्थिक सवलती पूर्णपणे सरकारला बंद कराव्या लागल्या.

**भाजपने मध्य प्रदेशात नुकतीच उमेदवारांची दुसरी यादी जारी केली. या यादीत एक नाही तर दोन नाही तर तीन तीन केंद्रीय मंत्र्यांची नावे आहेत. तसेच सात खासदार मैदानात उतरविण्यात आले आहेत. निवडणुकांची तारीख जाहीर करण्यापूर्वी उमेदवारांची नावे जाहीर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. अन्य पक्षांनी उमेदवारांची नावे जाहीर केलेली नाहीत.**

# जोरदार तयारीचा अन्वयार्थ

भाजप नेतृत्व या मंत्र्यांना आणि खासदारांना केंद्रीय कॅबिनेटमध्ये ठेवण्याच्या स्थितीत नाहीये, असा निष्कर्ष काढला जात आहे. मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीवरून भाजपने दुसऱ्या यादीत 39 जागांसाठी उमेदवारांची घोषणा केली आहे. अशावेळी भाजपला केंद्रीय मंत्री आणि खासदारांना उतरविण्याची गरज का भासली आणि मोठे चेहरे दाखवून काय मिळणार आहे? या गोष्टी विचार करावयास भाग पाडणाऱ्या आहेत. तीन केंद्रीय मंत्र्यांसह सात खासदार मैदानात उतरण्यामागे असेही म्हटले जाते की, भाजप कोणतीही जोखीम उचलण्यास तयार नाही. ज्या मैदानात या सात नेत्यांना उतरविण्यात आले आहे, तेथे बहुतांश जागांवर विजयाची शक्यता अधिक आहे आणि मध्य प्रदेशच्या राजकारणात या मंडळींची गणना दिग्गज नेत्यांत होते. या कारणांमुळे भाजपने या नेत्यांच्या माध्यमातून काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला धक्का देत विजयाच्या हमीसह वाटचाल सुरू केली आहे. काही दिवसांपूर्वी



भाजपने 39 उमेदवारांची पहिली यादी जारी केली होती. या यादीचे वैशिष्ट्य म्हणजे 2018 मध्ये ज्या जागांवर पराभव स्वीकारावा लागला होता, त्या जागांचा पहिल्या यादीत समावेश होता. या यादीत जुन्या चेहऱ्यांसह नवीन लोकांनाही संधी देण्यात आली. भाजपकडून जारी केलेल्या यादीनुसार, केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांना दिमनी मतदारसंघातून उतरवले आहे. दिमनीची जागा ही मुरैना जिल्ह्यातील सहा विधानसभा जागांपैकी एक आहे. 2018 मधील विधानसभा निवडणूक आणि 2020 च्या पोटनिवडणुकीत या जागेवर काँग्रेसला विजय मिळाला होता. अशावेळी भाजपने वरचष्मा गाजविण्यासाठी तोमर यांना उतरवले आहे. जे तीन केंद्रीय मंत्री आणि चार खासदारांना मैदानात आणले आहे, त्यामागे अनेक कारणे आहेत. या नेत्यांचे आपापल्या भागावर चांगले वर्चस्व आहे. यादीत अशीही काही नावे आहेत की, त्यांचा उल्लेख मुख्यमंत्री होण्याच्या शर्यतीत आहे. नरेंद्रसिंह तोमर, केंद्रीय मंत्री प्रल्हाद पटेल, इंदूरचे कैलास विजयवर्गीय यांना तिकीट दिले आहे. त्याचवेळी राकेश सिंह जबलपूरचे खासदार आहेत. विशेष म्हणजे 2018 ची विधानसभा आणि 2019 ची लोकसभा निवडणूक यांच्याच नेतृत्वाखाली लढली गेली होती. भाजपचे प्रदेशाध्यक्ष होते आणि ते सलग चारवेळा भाजपचे खासदार राहिलेले आहेत. भाजपने त्यांना मैदानात उतरवण्यामागचे कारण म्हणजे जेव्हा नेते मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत असतील तर ते अधिक मेहनत करतील, अशी आशा आहे. विधानसभेची तारीख जाहीर करण्यापूर्वी उमेदवारांची नावे जाहीर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. अर्थात अन्य पक्षांनी उमेदवारांची नावे जाहीर केलेली नाहीत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# टोलविरोधी याचिका मागे घेतली का?

## » राज ठाकरे दोन दिवसांत घेणार मुख्यमंत्री शिंदे यांची भेट

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ठाण्यातील टोल विरोधात एकनाथ शिंदे यांनीच कोर्टात याचिका दाखल केली होती. मात्र, नंतर त्यांनी ती याचिका मागे का घेतली? शिंदेंना याचिका कुणी मागे घ्यायलाल लावली?, असा सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केला आहे.**

तसेच, येत्या दोन दिवसांत आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षावर भेट घेणार आहोत. तेव्हा टोलदरवाढीबाबत त्यांच्याशी चर्चा करुन याबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी करू, अशी माहितीही राज ठाकरे यांनी दिली. त्यानंतर टोलचे काय करायचे, हे मी तुम्हाला सांगेल, असा इशाराही राज ठाकरेंनी दिला. ठाण्यातील टोलदरवाढीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव चार दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले होते. राज ठाकरे यांनी आज त्यांची भेट घेतली व उपोषण मागे घ्यायला लावले.



याबाबत राज ठाकरे यांनी सांगितले की, मी अविनाश जाधवला फोन केला होता. त्याला म्हटले उपोषण वगैरे आपले काम नाही. उद्या मी येतो. त्यानुसार आज आलोय. अविनाशला भेटलो. या लोकांसाठी जीव गमावू नकोस असे अविनाशला सांगितले. एक माणूस मेल्याने यांना काही फरक पडत नाही. अविनाशला उपोषण मागे घ्यायला लावले आहे.

राज ठाकरे म्हणाले, टोल दरवाढीविरोधात येत्या दोन चार दिवसात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचीही भेट घेणार आहे. त्यानंतरच टोलचं काय होणार हे मी तुम्हाला सांगेल. विशेष म्हणजे ठाण्यातील टोलदरवाढीविरोधात एकनाथ शिंदे यांनीच कोर्टात याचिका केली होती. ही याचिका त्यांनी मागे का घेतली? कुणाच्या सांगण्यावरून त्यांनी याचिका मागे घेतली. हा माझा एकनाथ शिंदे यांना सवाल आहे. तसेच, ठाण्याच्या आजुबाजूला पाच टोल आहेत. ते सर्व टोल म्हैसकरांचे आहेत. हे म्हैसकर कोण आहेत?

### टोल किती जमा होतो ?

» मला टोलच्या आंदोलनाचे काय झाले हे विचारलं जाते. पण त्याचे रिझल्ट कुणाला दिसत नाहीत. राज ठाकरे म्हणाले, नागरिकांकडून भरमसाठ टोल वसूल केला जातो. पण, रस्ते नीट बांधले जात नाही तर कर का घेतला जातो. रोड टॅक्स आणि टोलही भरला जातो. हे पैसे जातात कुठे?. टोलमध्ये गाड्या किती जातात, टोल किती जमा होतो आणि त्याचं होतं काय? याचा हिशेब आपण घेणार आहोत की नाही? अन्यथा लोकांचा आक्रोश परवडणारा नाही

सरकारचे ते एवढे लाडके आहेत का? मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाण्याचे आहेत. त्यांना लोकांचा आक्रोश परवडणारा नाही. त्यामुळे तेदेखील ठोस निर्णय घेतील, अशी अपेक्षा राज ठाकरेंनी व्यक्त केली. राज ठाकरे पुढे म्हणाले, अनेक वर्षापासून टोल विरोधात आम्ही अनेक आंदोलने केली. आम्ही 62 ते 67 टोलनाके बंद केले. 2014ला शिवसेना आणि भाजपचा जाहीरनामा आला होता. त्यात त्यांनी टोलमुक्त महाराष्ट्र करू असे जाहीर केले होते. 2014 आणि 2017 लाही जाहीर केले होतं. पण पत्रकार त्यांना याबाबत विचारत नाही. मला मात्र टोलच्या आंदोलनाचे काय झाले हे विचारलं जाते. पण त्याचे रिझल्ट कुणाला दिसत नाहीत.

# भुजबळांच्या अडचणी वाढणार?

## » अंजली दमानियांची न्यायालयात धाव

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याविरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. छगन भुजबळांशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारांची चौकशी कधी होणार? अशी विचारणा करणारी याचिका दमानिया यांनी दाखल केली आहे.**

दमानिया यांनी न्यायालयात धाव घेतल्याने छगन भुजबळ यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहे. न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर अंजली दमानिया यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना अंजली दमानिया म्हणाल्या, "नाशिकचे आमदार सुहास कांदे यांनी काही दिवसांपूर्वी विधानसभेत एक लक्ष्यवेधी लावली होती. छगन भुजबळ यांच्याविरोधातील प्रलंबित कारवाई कधी होणार? भ्रष्टाचार विरोधी पथक कधी कारवाई करणार? असे प्रश्न त्यांनी विचारले होते. ही लक्ष्यवेधी एप्रिलमध्ये लावली होती. आज आपण ऑक्टोबरमध्ये आहोत. अजूनही भ्रष्टाचार विरोधी पथकाने छगन भुजबळांवर कुठलीही कारवाई केली नाही. याचा अर्थ काय? तुम्ही जर मोठे नेते असाल आणि तुम्ही कितीही भ्रष्टाचार केला, तर तुम्ही एकच काम करायचं, सत्ताधारी पक्षात जाऊन बसायचं, असा आहे का?" असा सवाल अंजली दमानिया यांनी विचारला.



### भुजबळांवर कुठलीही कारवाई नाही

» एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना अंजली दमानिया म्हणाल्या, "नाशिकचे आमदार सुहास कांदे यांनी काही दिवसांपूर्वी विधानसभेत एक लक्ष्यवेधी लावली होती. छगन भुजबळ यांच्याविरोधातील प्रलंबित कारवाई कधी होणार? भ्रष्टाचार विरोधी पथक कधी कारवाई करणार? असे प्रश्न त्यांनी विचारले होते. ही लक्ष्यवेधी एप्रिलमध्ये लावली होती. आज आपण ऑक्टोबरमध्ये आहोत. अजूनही भ्रष्टाचार विरोधी पथकाने छगन भुजबळांवर कुठलीही कारवाई केली नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याविरोधात दमानिया यांनी उच्च न्यायालयात धाव घेत न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबद्दल विचारलं असता मंत्री छगन भुजबळ म्हणाले, "त्या कसली चौकशी करतायत, याची मला कल्पना नाही. महाराष्ट्र सदन प्रकरणातून माझी सुटका झाली आहे. त्यामुळे त्यांनी न्यायालयात काय मागणी केली आहे? याची मला कल्पना नाही. असे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले.

# हिंदू विरुद्ध बोलाल तर समूळ उच्चाटन करू! : साध्वी प्रज्ञासिंह

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

भारत देशात राहून सुद्धा येथील संस्कृती व धर्म याविषयीची माहिती नाही, अशा लोकांकडून सध्या हिंदू विरोधी विविध प्रकारची वक्तव्य केली जात आहेत. जे हिंदू विरोधी बोलतील त्यांचे समूळ उच्चाटन करू, असे प्रतिपादन भोपाळच्या खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी वसईत केले. वसईत प्रखर राष्ट्र चेतना सभेच्या निमित्ताने घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

रविवारी वसईत संत धर्म सभा, वसई यांच्या तर्फे प्रखर राष्ट्र चेतना सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेपूर्वी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी वसईतील पत्रकारांशी संवाद साधला. भारत हा देश आहे मात्र इंग्रजांनी त्याचे इंडिया करून देशाला बदनाम करण्याचे काम केले आहे. भारत हे सनातन राष्ट्र आहे आणि सनातन धर्म आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले आहे. तसेच जे हिंदू विरोधी वक्तव्य करून धार्मिक भावना भडकविण्याचे काम करीत आहे. काँग्रेसने सतत जातीचे राजकारण केले आहे. जे कोणी हिंदू विरोधी व हिंदू धर्मविषयी बेताल वक्तव्य करीत असतील त्यांचे समूळ उच्चाटन केले जाईल. लव्ह जिहाद सारख्या अनेक घटना समोर येऊ लागल्या आहेत. हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकविले जात आहे. याशिवाय अत्याचाराच्या घटना घडत आहेत. यासाठी मुलींनीसुद्धा आपल्या आत्मरक्षणासाठी शस्त्र जवळ बाळगले तर काहीच चुकीचे नाही, असे त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. ईडीची अनेक मोठ्या राजकीय नेत्यांवर कारवाई सुरू होती. मात्र भाजपा मध्ये आल्यानंतर ते निर्दोष कसे होतात? असा प्रश्न काही पत्रकारांनी साध्वी यांना विचारला. त्याला उत्तर देताना केवळ भाजपात आले म्हणून त्यांच्यावरील कारवाई थांबली असे नसून त्यांच्या चौकशी नंतर त्यांना निर्दोष सोडले आहे.

# इस्रायलमध्ये गंभीर परिस्थिती!

## » दहशतवाद्यांकडून बलात्काराचा शस्त्रासारखा वापर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पॅलेस्टाईनमधील हमास दहशतवादी संघटनेनं शनिवारी सकाळी इस्रायलवर रॉकेट हल्ला केला आहे. हमासकडून एकाच वेळी पाच हजार रॉकेट सोडल्याने इस्रायलमध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालं आहे. हमासने हल्ला केल्यानंतर इस्रायलच्या अनेक महिला बेपत्ता झाल्या आहेत. संबंधित महिलांचं हमास दहशतवादी संघटनेनं अपहरण केल्याची माहिती मिळत आहे.**

हमास दहशतवादी संघटनेकडून बलात्काराचा शस्त्र म्हणून वापर केला जात असल्याची भीती ‘इस्रायल वॉर रुम’कडून व्यक्त करण्यात आली आहे. ‘इस्रायल वॉर रुम’ या स्वयंसेवी संस्थेनं आपल्या अधिकृत अकाऊंटवर हमासच्या हल्ल्यानंतर बेपत्ता झालेल्या महिलांचा फोटो शेअर केला. यावेळी हमासकडून शस्त्र म्हणून बलात्काराचा वापर केला जात असल्याची भीती व्यक्त केली. ‘इस्रायल वॉर रुम’ ने अधिकृत ‘एक्स’ खात्यावर लिहिलं की, हमास या दहशतवादी संघटनेनं बहुतेक महिलांचं अपहरण केल्याचं



दिसत आहे. हमासचे दहशतवादी बलात्काराचा वापर युद्धाचं शस्त्र म्हणून करत असल्याची पुष्टी यापूर्वीच झाली आहे. या रानटी लोकांवर दयामाया दाखवली जाऊ नये. खरं तर, शनिवारी (७ ऑक्टोबर) सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. ज्यामध्ये हमासच्या दहशतवाद्यांनी एका महिलेच्या नग्न मृतदेहाची धिंड काढली. यावेळी काही लोक तिच्या मृतदेहावर थुंकताना व्हायरल व्हिडीओत दिसत आहेत. कौर्याची परिसीमा गाठणारा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर अनेक इस्रायलच्या अनेक महिला बेपत्ता असल्याची माहिती समोर येत आहे. हल्ल्यात गाझा शहराच्या मध्यभागी असलेला सर्वात मोठा टॉवर जमीनदोस्त झाला. या हल्ल्यामध्ये गाझातील अनेक निवासी भागही या युद्धाचे बळी ठरले आहेत. इस्रायलच्या हवाई हल्ल्यात काही ठिकाणी संपूर्ण उंच इमारती जमीनदोस्त झाल्या, तर काही ठिकाणी युद्धाचे थेट कव्हरेज करणाऱ्या पत्रकारांना अनपेक्षित प्रसंगांना सामोरे जावे लागले. या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता, महिला पत्रकाराने दिलेल्या माहितीनुसार, इमारत पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे आणि जमिनीवर पडली आहे. आजूबाजूच्या सर्व इमारती पाहिल्यास किती नुकसान झाले असेल याची कल्पना येऊ शकते.

### इस्रायलचे पंतप्रधान काय म्हणाले?

» इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू म्हणाले, आमचे उद्दिष्ट साध्य होईपर्यंत हे हल्ले सुरूच राहतील. या दरम्यान आम्ही इस्रायलच्या नागरिकांच्या सुरक्षेचाही विचार करत आहोत, तसेच मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांमध्ये शत्रूंना वीज, इंधन आणि इतर वस्तूंचा पुरवठा थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# अफगाणिस्तानात तीव्र भूकंप!

## » भूकंपात मोठ्या प्रमाणात झाली जिवीतहानी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शनिवारी अफगाणिस्तानमध्ये ६.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपात मोठ्या प्रमाणात जिवीतहानी झाली असून मालमत्तेचं प्रचंड नुकसान झालं आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारची धांदल उडाली आहे. अफगाणिस्तानातील भूकंपात दोन हजाराहून अधिक लोकांचा मृत्यू आणि ९ हजाराहून अधिक लोक जखमी झाल्याची माहिती तालिबान प्रशासनाने रविवारी दिली.**

शनिवारी अफगाणिस्तानच्या पश्चिमेकडील परिसरात भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू हेरात शहराच्या वायव्येस ३५ किलोमीटर (२० मैल) अंतरावर होता. या भूकंपाची तीव्रता ६.३ रिश्टर स्केल असल्याचं यूएस भूवैज्ञानिक सर्वेक्षणाने (USGS) सांगितलं. फेब्रुवारीमध्ये टर्की आणि सीरियामध्ये झालेल्या भूकंपात अंदाजे ५० हजार लोकांचा जीव गेला होता.



हा आतापर्यंतचा जगातील सर्वाधिक प्राणघातक भूकंपापैकी एक होता. त्यानंतर आता अफगाणिस्तानमध्ये तीव्र भूकंप झाला असून मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी झाली आहे.

आपत्ती मंत्रालयाचे प्रवक्ते जनन सईक यांनी सांगितलं की, अफगाणिस्तानमधील भूकंपात २०५३ लोकांचा मृत्यू झाला, तर ९२४० लोक जखमी झाले. तसेच १३२० घरांचं नुकसान झालं. रविवारी सकाळी ‘रेड क्रेसेंट’ने ५०० लोकांचा मृत्यू झाल्याचं सांगितलं होतं. आता मृतांचा आकडा वाढला आहे. इराणच्या सीमेला लागून असलेल्या भागात दहा बचाव पथके कार्यरत असल्याचंही सईक यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं.

हेरात येथील रुग्णालयात २०० हून अधिक मृतांना आणण्यात आलं होतं. यामध्ये बहुतेक महिला आणि मुलांचा समावेश होता, अशी माहिती हेरातच्या आरोग्य विभागाचे अधिकारी डॉ. दानिश यांनी दिली. तसेच इतरही अनेक मृतदेह लष्करी तळ आणि विविध रुग्णालयात नेण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

### जगातील सर्वाधिक प्राणघातक भूकंप

» या भूकंपाचा केंद्रबिंदू हेरात शहराच्या वायव्येस ३५ किलोमीटर (२० मैल) अंतरावर होता. या भूकंपाची तीव्रता ६.३ रिश्टर स्केल असल्याचं यूएस भूवैज्ञानिक सर्वेक्षणाने (USGS) सांगितलं. फेब्रुवारीमध्ये टर्की आणि सीरियामध्ये झालेल्या भूकंपात अंदाजे ५० हजार लोकांचा जीव गेला होता. हा आतापर्यंतचा जगातील सर्वाधिक प्राणघातक भूकंपापैकी एक होता. त्यानंतर आता अफगाणिस्तानमध्ये तीव्र भूकंप झाला असून मोठ्या प्रमाणावर जिवीतहानी झाली आहे.

# भाजप सत्तेत येणे देशासाठी धोक्याचे!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन म्हणाले की, भाजप तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यास देशाला मोठा धोका होईल, त्यानंतर पश्चाताप करण्यात अर्थ नाही. देशात जर एखाद्या समाजाने गाय खाल्ली तर ते देशाची शत्रू आहे असे दाखवले जात आहे, त्यामुळे जातीय हिंसाचार होत आहे. केंद्र सरकार आणि आरएसएस देशातील विविधता नष्ट करून एका धर्माच्या लोकांचा देश बनवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले की, देशाच्या प्रत्येक नागरिकाला राज्यघटनेत धर्म, जात, पंथ यांचा विचार न करता समान अधिकार आहेत, मात्र त्यात बदल केला जात आहे. त्यामुळे अल्पसंख्याक समाजातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. 8 ऑक्टोबर रोजी एका कार्यक्रमात ते बोलत होते. विजयन म्हणाले- भाजपलाही कळून चुकले आहे की, तिसऱ्यांदा सत्तेवर येणे शक्य नाही. या जाणीवेने त्यांना अलीकडे काही धोकादायक पावले उचलण्यास प्रवृत्त केले. देशातील चार राज्यांमध्ये विरोधी पक्षांची सत्ता आहे. विविध केंद्रीय संस्था तेथे छापे टाकत आहेत. भाजपकडून अशाच आणखी काही कृतींची अपेक्षा केली जाऊ शकते, परंतु ती लोकांच्या मनावर बदलण्यासाठी किंवा प्रभावित करण्यासाठी पुरेशी ठरणार नाही. भाजपला पराभूत करण्यासाठी विरोधी एकजूट आणखी मजबूत करण्याची गरज आहे. केरळमध्ये सत्ताधारी सीपीआय (एम) आणि विरोधी पक्ष काँग्रेसने 'द केरळ स्टोरी' चित्रपट प्रदर्शित होताच त्यावर बंदी घालण्याची मागणी केली होती. सीएम पिनाराई विजयन यांनी हा चित्रपट संघ परिवाराच्या (आरएसएस) खोट्या कारखान्याची निर्मिती असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की, राज्याविरुद्ध द्वेष पसरवण्याच्या उद्देशाने याची निर्मिती करण्यात आली आहे. 'द केरळ स्टोरी' या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये केरळमधील 32 हजार मुलींनी आपला धर्म बदलून इस्लाम धर्म स्वीकारला आणि दहशतवादी संघटना ISIS मध्ये सामील झाल्याचा दावा करण्यात आला आहे. एका कटाचा भाग म्हणून ब्रेनवॉश झालेल्या चार मुलींची कथा या चित्रपटात दाखवण्यात आली आहे. नंतर त्याचे धर्मांतर करून ISIS मध्ये पाठवण्यात आले.

# साराचे पॅरिसमध्ये वर्कआउट

सारा अली खान सध्या पॅरिसमध्ये सुटी घालवत आहे. दरम्यान, अभिनेत्रीने तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर तिचा एक वर्कआउट व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती पॅरिसमधील जिममध्ये वर्कआउट करताना दिसली. व्हिडिओ शेअर करताना साराने कॅप्शनमध्ये लिहिले - जॅमऐवजी जिम. पॅरिसमधील सर्वोत्तम जिममधील सर्वोत्तम सकाळ. व्हिडिओमध्ये अभिनेत्री जिममध्ये घाम गाळताना दिसत आहे. ती क्रॉस-फिटनेस आणि सायकलिंगपासून अनेक वेगवेगळे व्यायाम करताना दिसली. लूकबद्दल बोलायचे झाले तर, साराने पांढऱ्या स्पोर्ट्स टॉपसह ब्लू शॉर्ट्स आणि पांढरे शूज घातले आहेत. सर्व चाहत्यांना हा व्हिडिओ खूप आवडला आहे. व्हिडिओवर टिप्पणी करताना, एका वापरकर्त्याने लिहिले - किलिंग इट. दुसऱ्याने लिहिले- अप्रतिम, खूप प्रेरणादायी. तिसऱ्या यूजरने लिहिले- माझी फिटनेस क्वीन. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले - तुमचे परिवर्तन कौतुकास्पद आहे. साराने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर तिच्या व्हेकेशनचे अनेक सुंदर फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये ती तिच्या मैत्रिणीसोबत पॅरिसमध्ये फिरत आहे. यावेळी ती कॅज्युअल लूकमध्ये दिसली. साराने पांढऱ्या टॉपसह ब्लू डेनिम जीन्स घातली आहे. ग्रीन स्लिंग बॅग, पांढरे शूज आणि मॅचिंग गॉगलसह तिने हा लूक पूर्ण केला. साराच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर ती शेवटची विकी कौशलसोबत जरा हटके जरा बचकेमध्ये दिसली होती. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



# सनीवर नेटकऱ्यांची आगपाखड!

माधुरी दीक्षित ही बॉलिवूडची यशस्वी अभिनेत्री आहे. तिने आजवर बऱ्याच हिट चित्रपटातुन प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. तिचा 1995 साली 'याराना' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. दिग्दर्शक डेविड धवन या चित्रपटातील 'मेरा पिया घर आया' हे गाणे खूप लोकप्रिय झाले. या गाण्यात माधुरीने तिच्या अप्रतिम नृत्याने सर्वांनाच वेड लावले होते. आता माधुरीच्या या आयकॉनिक गाण्याचा रिमेक करण्यात आला आहे. तब्बल 28 वर्षांनंतर बी टाऊन अभिनेत्री सनी लिओनीने 'मेरा पिया घर आया' या गाण्याचा रिमेक तयार केला आहे जो आज प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. सनी लिओनच्या नुकत्याच रिलीज झालेल्या " मेरा पिया घर आया 2.0 " ने प्रेक्षकांना भुरळ घातली आहे. माधुरी दीक्षित नेने यांच्यावर चित्रित केलेल्या आयकॉनिक ट्रॅक च्या नव्याकोऱ्या म्युजिक व्हर्जन ने रसिकांची मने जिंकली आहेत. सनीने यापुर्वीही बऱ्याच बॉलिवूड चित्रपटांमध्ये आयटम साँग केले आहेत. त्याचबरोबर सनीने अनेक म्युझिक व्हिडिओंमध्येही तिच्या नृत्याची झलक दाखवली आहे. आता सनी लिओनीने आता बॉलिवूड सुपरस्टार माधुरी दीक्षितच्या 'मेरा पिया घर आया' या सुपरहिट गाण्याचा रिमेकने सर्वांना धक्का दिला आहे.

# पुन्हा चिडली तापसी!

अभिनेत्री तापसी पन्नू शनिवारी रात्री शरद केळकरच्या वाढदिवसाच्या पार्टीत सहभागी झाली होती. रात्री उशिरा ती मुंबईतील एका रेस्टॉरंटच्या बाहेर स्पॉट झाली. डिनरनंतर तापसी रेस्टॉरंटमधून बाहेर पडली तेव्हा तिने पाहिले की पापाराझी तिच्या कारभोवती उभे आहेत. हे पाहून तापसीला राग आला आणि तिने पापाराझींना टोमणे मारले आणि कारपासून दूर जाण्याची विनंती केली. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये, तापसी पापाराझींना पुन्हा पुन्हा तेच बोलून तिच्या कारसमोरून दूर जाण्याची विनंती करत आहे. ती म्हणतेय, प्लीज बाजुला व्हा, प्लीज बाजुला व्हा, नाहीतर म्हणाल की धक्का लागला आहे. प्लीज दूर जा, प्लीज दूर जा, आरामात बोलत आहात नाहीतर बोलाल, धक्काच लागला. कृपया दूर जा..' यानंतर, जेव्हा पापाराझी तिच्या कारसमोरून दूर गेली तेव्हा तापसीने त्यांचे आभार मानले. ती गाडीत बसताच एक पापाराझी म्हणाला, 'धन्यवाद, बाय तापसी जी.. तुम्ही खूप छान आहात..' शरद केळकरच्या वाढदिवसाच्या पार्टीत तापसी ब्लॅक टॉप आणि पिवळ्या स्कर्टमध्ये दिसली होती. तिने एक बॅगही घेतली होती. तथापि, तापसीचा पापाराझींसोबत वाद होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही अनेकवेळा छायाचित्रकारांशी तिचा वाद झाला आहे. गेल्या वर्षी 'दोबारा' चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान तापसी एका कार्यक्रमात उशिरा पोहोचली होती आणि पापाराझींसोबत वाद झाला होता. जेव्हा पापाराझी तिला म्हणाले की, आम्ही खूप दिवसांपासून तुझी वाट पाहत आहोत, तेव्हा तापसी म्हणाली, तुम्ही माझ्यावर रागवत आहात का? मला दिलेल्या वेळेवर मी येत आहे.



# उर्फीनं केला रस्त्यावर पडलेल्या सिगारेटचा वापर



आपल्या हटके आणि भन्नाट ड्रेसिंग सेन्समुळे कायम चर्चेत राहणारी उर्फी जावेद ही कधी काय फॅशन करेल याचा नेम नाही. तिने नुकतीच एका वृत्त संस्थेला मुलाखत दिली होती त्यानंतर ती चर्चेत आली. उर्फी ही तिच्या अतरंगी फॅशनसाठी ओळखली जाते तिने कधी सायकलची चैन तर कधी कंगवा अशा अनेक वस्तूंचा वापर करुन ड्रेस तयार केले आहेत. आता मात्र उर्फीनं अशा वस्तूपासून ड्रेस तयार केला आहे की ते पाहिल्यानंतर नेटकऱ्यांनी पुन्हा डोक्याला हात लावला आहे. आता उर्फीनं सिगारेटच्या थोटक्यांचा वापर करुन ड्रेस तयार केला आहे. तिने रस्त्यावरून ही एक एक करत ही थोटकं गोळा केली आहे. याचा वापर करत तिने आपला नवा ड्रेस तयार केला आहे. उर्फीच्या या नवीन ड्रेसचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. उर्फीनं याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेयर केला आहे. या व्हिडिओमध्ये दिसते की उर्फी रस्त्यावर सिगारेटच्या थोटकं गोळा करत आहे. यानंतर उर्फी ती एक-एक करून ही सर्व थोटकं तिच्या ड्रेसला जोडली आणि काही वेळातच तयार झाला तो उर्फी जावेदचा नवा ड्रेस उर्फी जावेदने सिगारेटपासून ऑफ शोल्डर ड्रेस बनवला. उर्फी या ड्रेसमध्ये खुपच बोल्ड आणि हॉट दिसत आहे. तिने हा ड्रेस परिधान करुन वेगवेगळ्या पोज दिल्या आहेत. उर्फी जावेदने हा व्हिडिओ इंस्टाग्रामवर शेअर करत इंस्टाग्रामवर कॅप्शनमध्ये लिहिलंय की, 'हा ड्रेस बनवल्यानंतर अनेक दिवस माझ्या हातांचा सिगारेटचा वास येत होता.' उर्फीचा हा व्हिडिओ काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाला. ज्यावर चाहत्यांनी खुप खूप कमेंट केल्या आहेत. तर अनेकांनी तिला ट्रोलही केलं आहे. आत्तापर्यंत उर्फी जावेदने पोत्यापासून ब्लेड, लोखंडी साखळी, इलेक्ट्रिक वायर ते मोबाइल सिमपर्यंत अनेक गोष्टींनी बनवलेल्या ड्रेस बनवला आहे.

# युद्धात अडकली होती नुसरत!

इस्रायल आणि पॅलेस्टिनी दहशतवादी संघटना हमास यांच्यात सुरू असलेल्या युद्धात अभिनेत्री नुसरत भरुचा अडकली होती. नुसरतच्या टीमने शनिवारी दुपारी 12.30 वाजता तिच्याशी शेवटचा संवाद साधला. तेव्हापासून तिच्याशी संबंधित कोणतेही अपडेट समोर आले नव्हते. आता तिच्याशी संपर्क साधल्याचे टीमने सांगितले. भारतात परतण्यासाठी ती इस्रायल विमानतळावर पोहोचली आहे. नुसरतच्या टीममधील एका सदस्याने एक स्टेटमेंट जारी केले होते की - नुसरत इस्रायलमध्ये अडकली आहे. हैफा फिल्म फेस्टिव्हलमध्ये सहभागी होण्यासाठी ती ९ दिवसांपूर्वी भारतातून इस्रायलला रवाना झाली होती. काल दुपारी साडेबारा वाजता टीमने तिच्याशी शेवटचा संवाद साधला. संवादादरम्यान नुसरतने सांगितले होते की ती तळघरात लपली होती आणि सुरक्षित आहे. कालपासून तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू होता, मात्र तिच्याशी संपर्क होऊ शकला नसल्याचे टीमने सांगितले. नुसरतला सुखरूप भारतात परत आणण्यासाठी त्याची टीम सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. नुसरत सुखरूप परत यावी, अशी प्रार्थना सर्वजण करत होते. शनिवारी सकाळी इस्रायलवर ५ हजार रॉकेटने हल्ला करण्यात आला. इस्रायलला लागून असलेल्या वादग्रस्त गाझा येथून हा हल्ला करण्यात आला. हमासने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्यावर इस्रायलने युद्धाची घोषणा केली. या हल्ल्यानंतर 300 इस्रायली आणि 230 पॅलेस्टिनींना आपला जीव गमवावा लागला आहे. हमास आणि इस्रायल यांच्यातील अचानक झालेल्या संघर्षात मेघालयातील 27 आणि नेपाळमधील 7 लोक इस्रायलमध्ये अडकले आहेत. नुसरत शेवटची अकेली चित्रपटात दिसली होती. या चित्रपटात युद्धात इराकमध्ये अडकलेल्या एका भारतीय मुलीची कथा दाखवण्यात आली आहे. ही मुलगी 2014 मध्ये इराकमध्ये सुरू असलेल्या गृहयुद्धात अडकते आणि तेथून पळून जाण्यासाठी आणि तिचा जीव वाचवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करते. नुसरतने भारतीय मुलीची भूमिका साकारली आहे. आता खऱ्या आयुष्यात ती इस्रायल आणि पॅलेस्टाईनमधील युद्धात अडकली आहे.



# विराट-राहुलची जिगरबाज खेळी!

## » विश्वचषकाच्या पहिल्या सामन्यात भारताचा विजय

**नवी दिल्ली । । वृत्तसंस्था**

**टीम इंडियाने एकदिवसीय विश्वचषक 2023 मध्ये विजयाने आपल्या मिशनची सुरुवात केली आहे. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा 6 गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 49.3 षटकात 199 धावा केल्या. स्टीव्ह स्मिथने सर्वाधिक 46 धावा केल्या. भारताकडून रवींद्र जडेजाने 3, कुलदीप यादव आणि जसप्रीत बुमराहने 2-2 विकेट घेतल्या. तर मोहम्मद सिराज, हार्दिक पांड्या आणि रविचंद्रन अश्विनने 1-1 विकेट घेतली.**

तिसऱ्या क्रमांकावर खेळायला आलेल्या विराट कोहलीने विश्वचषकात आपले ५वे अर्धशतक झळकावले. त्याने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील 67 वे अर्धशतक पूर्ण केले. कोहलीने 116 चेंडूत 73.28 च्या स्ट्राईक रेटने 85 धावा केल्या. कोहलीच्या खेळीत 6 चौकारांचा समावेश होता. 3 विकेट लवकर गमावल्यानंतर विराट कोहली आणि केएल राहुलने भारतीय डावाची धुरा सांभाळली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी 215 चेंडूत 165 धावांची भागीदारी केली. हेझलवूडने कोहलीला बाद करून ही भागीदारी तोडली. 200 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. संघाने 10 षटकांत 3 बाद 27 धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मा, इशान किशन आणि श्रेयस अय्यर 0 धावांवर बाद झाले. प्रत्युत्तरात भारताचा डाव गडगडला. संघाने इशान किशन, रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यरचे विकेट 2 धावांवर गमावले. तिघेही खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतले. चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाचा संघ 49.3 षटकांत सर्वबाद 199 धावांवर आटोपला. स्टीव्ह स्मिथने 46 धावांची तर डेव्हिड वॉर्नरने 41 धावांची खेळी खेळली. भारताकडून रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि रविचंद्रन अश्विन यांनी मिळून 6 कांगारू




फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. ऑस्ट्रेलिया संघाकडून सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने 41 आणि स्टीव्ह स्मिथने 46 धावा केल्या. भारतीय संघाकडून रवींद्र जडेजाने तीन विकेट घेतल्या. कुलदीप यादव आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. तर रविचंद्रन अश्विन आणि मोहम्मद सिराज यांना 1-1 विकेट मिळाली. ऑस्ट्रेलियन सलामीवीर वनडे वर्ल्ड कपमध्ये सर्वात जलद 1000 धावा करणारा खेळाडू ठरला आहे. वॉर्नरने हा विक्रम 19 डावात केला. याआधी हा विक्रम सचिन तेंडुलकर आणि एबी डिव्हिलियर्स (20 डाव) यांच्या नावावर होता. नाणेफेक जिंकून फलंदाजीला आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाची सुरुवात सरासरीने झाली. संघाने 10 षटकांत एक विकेट गमावून 43 धावा केल्या. जसप्रीत बुमराहने मिचेल मार्शला स्लिपमध्ये विराट कोहलीकरवी झेलबाद केले. कोहली विश्वचषकात भारतासाठी सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू ठरला आहे. त्याने 15 झेल घेतले आहेत. कोहलीने कुंबळेचा विक्रम मोडला. मिचेल मार्श - 0 धावा: बुमराहच्या तिसऱ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर कोहलीकरवी झेलबाद झाला. बुमराहने बाहेरच्या दिशेने एक लेन्थ बॉल टाकला. चेंडू बॅटच्या काठावर लागून स्लिपमध्ये उभ्या असलेल्या कोहलीकडे गेला, तिथे त्याने शानदार झेल घेतला. टीम इंडियाने अलीकडेच आशिया चषक जिंकला आणि त्यानंतर तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत त्याच ऑस्ट्रेलियन संघाचा 2-1 असा पराभव केला. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियन संघाचा अलीकडचा विक्रमही अडचणीत आला आहे कारण भारतात येण्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मालिका गमावली होती. वर्ल्डकपपूर्वी टीम इंडियाला इंग्लंड आणि नेदरलँडविरुद्ध दोन सराव सामने खेळायचे होते. मात्र, पावसामुळे ही दोन्ही कामे होऊ शकली नाहीत. दुसरीकडे, सराव सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा पराभव केला होता. मात्र, दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत एकूण 149 एकदिवसीय सामने खेळले गेले आहेत. ऑस्ट्रेलियाने 83 सामने जिंकले आणि भारताने 56 सामने जिंकले. 10 सामने अनिर्णित राहिले. एकदिवसीय विश्वचषकातही ऑस्ट्रेलियाचा वरचष्मा आहे. दोन्ही संघांमध्ये 12 सामने झाले. ऑस्ट्रेलियाने 8 मध्ये आणि भारत फक्त 4 मध्ये जिंकला. मात्र, 2019 मधील शेवटचा सामना भारताने जिंकला होता.

### भारताचे अव्वल परफॉर्मर्स

» या सामन्यातील शुभमन गिलच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून तो या वर्षातील आतापर्यंतच्या फलंदाजीत आमचा अव्वल परफॉर्मर ठरला आहे. गिलने 20 सामन्यात 1230 धावा केल्या आहेत. त्याने द्विशतकही झळकावले. गोलंदाजीच्या आघाडीबद्दल बोलायचे झाले तर, कुलदीप यादवने या वर्षात 17 एकदिवसीय सामन्यांमध्ये 33 बळी घेतले. या काळात त्याची इकॉनॉमी 4.72 होती. चेन्नईची खेळपट्टी साधारणपणे फिरकीला अनुकूल असते, आजही खेळपट्टी फिरकीसाठी अनुकूल वाटत असेल तर टीम इंडिया 3 फिरकीपटूंसोबत जाऊ शकते. रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादवसह रविचंद्रन अश्विनला संधी मिळू शकते.

# शुबमन गिल पुढील सामन्यातूनही बाहेर?

**नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज**

भारताचा सलामीवीर फलंदाज शुबमन गिल ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळत नसून त्याला डेंग्यू झाला आहे. शुबमन गिलचा ताप हा कमी झाला आहे की नाही? याची अपडेट मिळाली नाही. सध्या ज्याप्रकारच्या फॉर्ममध्ये तो आहे, ते पाहता त्याची प्लेइंग ११ मधील अनुपस्थिती हा संघासाठी मोठा धक्का मानला जात आहे. केवळ ऑस्ट्रेलियाच नाही तर गिल पुढील सामन्यातूनही बाहेर होऊ शकतो. भारताचा तिसरा सामना पाकिस्तानसोबत खेळला जाणार आहे आणि त्या सामन्यापर्यंत गिल तंदुरुस्त व्हावा अशी सर्वजण प्रार्थना करत आहेत. त्यांच्या संदर्भात नवीनतम अपडेट काय आहेत? जाणून घ्या. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्याच्या २ दिवस आधी बातमी आली होती की शुबमन गिलला डेंग्यू झाला आहे आणि त्याला ग्लुकोजचाही त्रास होत आहे. तो सतत सराव करतो, व्यायाम करतो आणि फिटनेससाठी कठोर परिश्रम करतो, त्यामुळे असे मानले जाते की तो लवकरच बरा होईल परंतु सध्या तो प्लेइंग ११ मधून बाहेर आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना महत्त्वाचा आहे पण हे सुरुवातीचे टप्पे आहेत आणि तो लवकरात लवकर परतावा अशी सर्वजण प्रार्थना करत आहेत. आता संघ व्यवस्थापनाकडून माहिती अशी येत आहे की, ११ ऑक्टोबरला अफगाणिस्तानविरुद्धही खेळणे त्यांच्यासाठी कठीण आहे.

# द. आफ्रिकेने 4 वर्ल्ड कप विक्रम मोडले!

## » सर्वोच्च धावसंख्या, प्रथमच एका डावात 3 शतके

**नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**एकदिवसीय विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेवर सर्वात मोठा विजय नोंदवला आहे. शनिवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात आफ्रिकन संघाने श्रीलंकेचा 102 धावांनी पराभव केला. बांगलादेशने पहिल्या सामन्यात अफगाणिस्तानचा 6 गडी राखून पराभव केला होता. नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर रविवारी झालेल्या सामन्यात चार विश्वचषक विक्रम झाले. यामध्ये सर्वोच्च धावसंख्या, वेगवान शतक, एका सामन्यात सर्वाधिक धावा आणि एका डावात तीन शतके अशा विक्रमांचा समावेश आहे.**




नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी 50 षटकांत 5 गडी गमावून 428 धावा केल्या. विश्वचषकाच्या इतिहासातील ही सर्वात मोठी धावसंख्या आहे. आफ्रिकन संघाने ऑस्ट्रेलियाचा 417 धावांचा विक्रम मोडला, जो संघाने 2015 मध्ये अफगाणिस्तानविरुद्ध केला होता.

दक्षिण आफ्रिकेने विश्वचषकात तिसऱ्यांदा विक्रमी 400 हून अधिक धावा केल्या. यापूर्वी संघाने आयर्लंड आणि वेस्ट इंडिजविरुद्धही अशी कामगिरी केली आहे. आतापर्यंत विश्वचषकात केवळ 5 वेळा 400 हून अधिक धावा झाल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेशिवाय भारत आणि ऑस्ट्रेलियाने प्रत्येकी एकदा अशी कामगिरी केली आहे. दक्षिण आफ्रिकेचा उपकर्णधार एडन मार्करमने एकदिवसीय विश्वचषकातील सर्वात जलद शतक झळकावले. त्याने अवघ्या 49 चेंडूत आपले शतक पूर्ण केले. मार्करमने दिलशान मदुशंकाच्या चेंडूवर फाइन लेगवर षटकार ठोकत शतक पूर्ण केले. मार्करमने आयरिश फलंदाज केविन ओब्रायनचा जलद शतकाचा विक्रम मोडला. ओब्रायनने 2011 मध्ये इंग्लंडविरुद्ध 50 चेंडूत शतक झळकावले होते. या सामन्यातही आयर्लंडने 3 विकेट्सने रोमहर्षक विजय मिळवला होता. दिल्लीच्या मैदानावर विश्वचषकाच्या सामन्यात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम झाला. दक्षिण आफ्रिका-श्रीलंका सामन्यात एकूण 754 धावा झाल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेने 428 आणि श्रीलंकेने 326 धावा केल्या.या सामन्यात 3 शतके आणि 3 अर्धशतकेही झाली.